# Chapter-13

# महिला उद्योजकता आणि आर्थिक विकास

**डॉ. सुरेखा भिंगारदिवे**

सहयोगी प्राध्यापिका ,अर्थशास्त्र विभागप्रमुख

के.जे.सोमैया कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय कोपरगाव

जि. अहिल्यानगर

**Email-**bhingardive.surekha@gmail.com

**सारांश :**

महिला उद्योजकता आणि आर्थिक विकास अत्यंत महत्वाचा आहे. कारण महिला समाजाला अधिक स्त्री-पुरुष समानतेला प्रोत्साहन देते. महिला उद्योजिका विविध आव्हाने स्वीकारून , मेहनत आणि संयम वापरून नाविन्यपूर्ण कल्पना विकसित करून व्यवसाय चालवतात. त्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळते. समाजाची प्रगती साधली जाते. परंतु महिला उद्योजकांना अजूनही अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे महिलाना उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या प्रगतीसाठी विशेष सरकारी धोरणे आणि आर्थिक मदतीची आवश्यकता आहे.

**सूचक शब्द** : महिला उद्योजकता , महिला उद्योजकता आणि आर्थिक विकास

**प्रस्तावना:-**

आजच्या जागतिक युगात महिला उद्योजकता ही राष्ट्राच्या आर्थिक विकासाची एक महत्त्वाची दिशा ठरली आहे. शिक्षण, तंत्रज्ञान,व्यावसायिक शिक्षण आणि सरकारी प्रोत्साहनामुळे महिलांनी उद्योग, व्यवसाय आणि सेवा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. महिला उद्योजकता ही केवळ आत्मनिर्भरतेचे प्रतीक नसून ती सामाजिक परिवर्तन आणि आर्थिक स्थैर्याचा पाया आहे.

भारतातील आर्थिक विकास प्रक्रियेत महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. आजच्या युगात महिलाचे कार्यक्षेत्र फक्त घरापुरते मर्यादित न राहता विविध क्षेत्रात त्या स्वतःचा ठसा उमटवत आहेत. महिला उद्योजकतेचा विकास म्हणजे केवळ महिलांचा आत्मसन्मान नव्हे तर देशाच्या आर्थिक प्रगतीचा एक मजबूत पाया आहे.

**उद्दिष्टे :**

१)महिला उद्योजकतेचा अभ्यास करणे.

२) महिला उद्योजकतेसाठी सरकारकडून राबवल्या जाणाऱ्या सरकारी उपक्रमांचा अभ्यास करणे.

३) महिला उद्योजकता आणि आर्थिक विकास याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :** प्रस्तुत शोधनिबंधसाठी दुय्यम साधन सामुग्रीचा वापर केला आहे. यामध्ये विषयाशी संबधित संदर्भ ग्रंथ, अहवाल मासिके, वर्तमान पत्र व विविध संकेत स्थळांचा वापर केला आहे.

**महिला उद्योजकता:-**

महिला उद्योजकता म्हणजे महिलांनी स्वतःच्या कल्पकतेच्या, कौशल्याच्या, ज्ञानाच्या आणि आत्मविश्वासाच्या जोरावर उद्योग किंवा व्यवसाय सुरू करून त्याचे यशस्वी व्यवस्थापन करणे होय. पूर्वी व्यवसाय क्षेत्र हे मुख्यतः पुरुषप्रधान मानले जात असे, परंतु आजच्या युगात महिलांनी त्या क्षेत्रात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे.महिला उद्योजकता ही केवळ आर्थिक स्वावलंबनाचे साधन नसून सामाजिक, मानसिक आणि वैयक्तिक सक्षमीकरणाचेही प्रतीक आहे. महिला उद्योग उभारून स्वतःबरोबरच इतरांनाही रोजगाराची संधी उपलब्ध करून देतात. " महिला उद्योजकता म्हणजे महिलांनी स्वतःच्या कल्पकतेच्या, कौशल्याच्या, नेतृत्वगुणांच्या आणि जोखीम पत्करण्याच्या क्षमतेच्या आधारे उद्योग किंवा व्यवसाय सुरू करून त्याचे व्यवस्थापन करणे". आधुनिक काळात महिला लघुउद्योग, हस्तकला, अन्नप्रक्रिया, आयटी, सेवा क्षेत्र, फॅशन डिझाईन, शिक्षण आदी अनेक क्षेत्रात सक्रिय आहेत.त्यामुळे महिला उद्योजकता ही आर्थिक विकासाची, सामाजिक प्रगतीची आणि स्त्री सक्षमीकरणाची प्रभावी दिशा ठरली आहे.

**महिला उद्योजकतेचे महत्व**

१. महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवते.

२. स्वतःसह इतरांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करते.

३. नवीन कल्पना उत्पादने आणि सेवा यांची निर्मिती होते आणि कौशल्य विकसीत होतात.

**महिला उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देणारे सरकारी उपक्रम किंवा योजना :-**

महिला उद्योजकतेस प्रोत्साहन देण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे.

**१. मुद्रा योजना ( Pradhan Mantri Mudra Yojana):-**

लघु व मध्यम उद्योग सुरू करण्यासाठी महिलांना कर्ज सहाय्य दिले जाते. या योजनेदवारे ५०,००० ते १० लाख पर्यंत महिलांना कर्ज मिळू शकते. त्यामुळे त्या लघु उद्योग सुरू करू शकतात. हे कर्ज सर्वजनिक बँका, खाजगी बँका सहकारी बँकाव्दारे दिले जाते.

**२. स्टार्टअप इंडिया (Start-up India):-**

महिलांना नाविन्यपूर्ण व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवल, प्रशिक्षण आणि कर सवलती दिल्या जातात.

. या योजनेचा उद्देश देशातील तरुणांना व महिलांना उद्योजकतेकडे आकर्षित करणे, नवीन व्यवसाय उभारण्यासाठी मदत करणे व नवोपक्रमाला चालना देणे. तसेच ही योजना महिला उद्योजकतेसाठी कार्यशाळा आयोजित करण्याचे कार्य करते.

### ३. महिला कोइर योजना (Mahila Coir Yojana):-

ग्रामीण भागातील महिलांना नारळ उद्योगाशी संबंधित प्रशिक्षण व साधनसामग्री उपलब्ध करून दिली जाते.नारळाच्या उत्पादन व प्रक्रिया क्षेत्रात स्वयं रोजगार उपलब्ध करून दिला जातो. प्रशिक्षणाच्या काळात महिलांना वेतन भत्ता दिला जातो.

### ४. महिला उद्योजकता विकास योजना (Women Entrepreneurship Development Programme):-

महिलांना स्वत: चा उद्योग सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देणे. तसेच आर्थिक सहाय्य देण्यासाठी केंद्र सरकारने ही योजना सुरू केली आहे.या योजनेत महिला उद्योजकांसाठी प्रशिक्षण ,कौशल्यविकास आणि व्यवसाय सल्ला दिला जातो.

अशा प्रकारे महिला उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देणाऱ्या विविध सरकारी योजना आहे. या योजनेव्दारे महिलांना उद्योग सुरु करण्यास प्रोत्साहन दिले जाते.

### महिला उद्योजकता आणि आर्थिक विकास:-

महिला उद्योजकता ही आजच्या काळातील आर्थिक आणि सामाजिक प्रगतीची शक्ती आहे.महिला उद्योजकतेमुळे केवळ वैयक्तिक प्रगतीच नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या आर्थिक विकासालाही चालना मिळते.महिलांनी उद्योग, व्यवसाय, सेवा, शिक्षण, आयटी, शेतीपूरक क्षेत्र अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली आहे. त्यांच्या उद्योजकतेमुळे केवळ स्वतःचे नव्हे तर कुटुंब, समाज आणि देशाचाही आर्थिक व सामाजिक विकास होत आहे.महिला उद्योजकतेमुळे रोजगारनिर्मिती, उत्पन्नवाढ, नवकल्पना, आणि ग्रामीण-शहरी संतुलित विकास साध्य होतो. त्यांच्या सहभागामुळे देशाचा GDP वाढतो आणि अर्थव्यवस्था अधिक स्थिर व शाश्वत बनते.

शासनाच्या विविध योजना, प्रशिक्षण कार्यक्रम आणि आर्थिक सहाय्यामुळे महिलांना उद्योजकतेच्या क्षेत्रात पुढे जाण्यास प्रोत्साहन मिळाले आहे. महिला उद्योजकता ही आर्थिक विकासाची गुरुकिल्ली आणि सामाजिक सक्षमीकरणाची प्रेरणा आहे. महिलांना प्रोत्साहन, शिक्षण आणि संधी दिल्यास त्या राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात.महिला उद्योजकता ही केवळ महिलांच्या व्यक्तिगत यशाची गोष्ट नसून राष्ट्राच्या आर्थिक विकासाची भक्कम पायाभरणी आहे. महिलांच्या सक्रिय सहभागामुळे अर्थव्यवस्थेत स्थैर्य, उत्पादकता आणि समृद्धी वाढते. त्यामुळे महिला उद्योजकतेस प्रोत्साहन देणे म्हणजे देशाच्या उज्ज्वल आर्थिक भविष्याची हमी देणे हो होय

### महिला उद्योजकतेमुळे होणारा आर्थिक विकास :-

### रोजगार निर्मिती :-

महिला उद्योजक स्वतः व्यवसाय सुरू करून अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतात. उत्पादन विक्री ,पॅकिंग ,मार्केटिंग अकौटिंग इ. अनेक क्षेत्रात अनेक कामगार आवश्यक असतात. त्यामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतो. बेरोजगारी कमी होऊन आर्थिक चक्र

वेगवान होते.भारतात महिलांचा रोजगार दर लक्षणीयरीत्या वाढला आहे,. महिला उद्योजकांचे प्रमाणही वाढले असून जवळ जवळ १३.५ ते १५.७ दशलक्ष महिलांच्या मालकीचे व्यवसाय आहेत, ते सुमारे २२ ते २७ दशलक्ष लोकांना रोजगार देतात .

**उत्पादन आणि निर्यात वाढ:-**

महिलांचे शिस्तबद्ध व्यवस्थापन ,योग्य नियोजन,सूक्ष्म निरीक्षण यामुळे देशांतर्गत उत्पादन वाढते.तसेच निर्यातक्षम वस्तूंची निर्मिती होते. त्यामुळे देशाच्या परकीय चलनात वाढ होते. तंत्रज्ञानाचा वापर आणि सरकारी योजना महिलांच्या निर्यात व्यवसायाला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहेत.जुट उत्पादने , टेक्स्टाइल, ज्वेलरी , नैसर्गिक उत्पादने इ. वस्तूंना जगभरात मोठी मागणी असते. तसेच भारतातील महिला उद्योजकतेचे उत्पादन आणि निर्यात आकडेवारीमध्ये वाढ झाली आहे. ज्यामध्ये उत्पादन आणि सेवा क्षेत्रांचा समावेश आहे.

**कर संकलन:-**

महिला उद्योजक या आर्थिकदृष्ट्या सक्षम होतात. तसेच त्या कर भरण्याच्या माध्यमातून सरकारच्या महसुलात भर टाकतात. त्यामुळे आर्थिक विकासाची पायाभरणी मजबूत होते. महिला उद्योजकतेचे कर संकलन वाढत आहे . त्यांच्या योगदानातून देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. महिला उद्योजकतेच्या कर संकलन आणि आकडेवारीबद्दल बोलायचं झाल्यास उच्च करदात्यांमध्ये महाराष्ट्र आघाडीवर आहे. . अनेक सरकारी योजना महिला उद्योजकतेला चालना देत आहेत, तरीही उद्योगांमध्ये महिलांचा सहभाग कमी आहे. परतू २०२५ पर्यंत महिलांनी भरलेल्या ईरिटर्नची संख्या - .वाढली आहे

**ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास:-**

ग्रामीण भागातील महिला लघुउद्योग, हस्तकला, दुग्धव्यवसाय, शेतीपूरक व्यवसाय यामध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होतात. यामुळे ग्रामीण विकासाला चालना मिळते आणि शहरांवरील आर्थिक ताण कमी होतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी महिला उद्योजकता महत्त्वाची आहे, जरी भारताचा जागतिक स्तरावर महिला उद्योजकता निर्देशांकांमध्ये Mastercard Women Entrepreneurship Index २०२१ मध्ये ५७ वा क्रमांक असला तरी. महिला उद्योजकांना सक्षम करण्यासाठी तांत्रिक प्रशिक्षण, आर्थिक साक्षरता आणि कौशल्य विकास आवश्यक आहे.

**सामाजिक सक्षमीकरण आणि समानता:-**

महिला उद्योजकतेचा थेट परिणाम सामाजिक पातळीवर दिसून येतो: महिला उद्योजक बनल्यामुळे त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळते, त्यामुळे कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढतो आणि स्वाभिमान सुधारतो. जेव्हा महिला व्यवसायात यशस्वी होतात, तेव्हा समाजात त्यांना अधिक समान दर्जा आणि ओळख मिळते.महिलांच्या कमाईमुळे मुलांच्या शिक्षणात आणि आरोग्याच्या सुविधांमध्ये

सुधारणा होते, त्यामुळे गरिबी कमी होण्यास मदत होते. असे असले तरी, भारतातील ९०% महिला उद्योजकांना सामाजिक निर्बंधांचा, जसे की कुटुंबाचा अपुरा पाठिंबा आणि सामाजिक दबावाचा सामना करावा लागतो. महिला उद्योजकता महिलांना आत्मनिर्भर आणि निर्णयक्षम बनवते. समाजात स्त्री-पुरुष समानतेचा विचार दृढ होतो, ज्यामुळे आर्थिक विकास अधिक समतोल आणि शाश्वत होतो.

**नवकल्पना आणि तंत्रज्ञान विकास :-**

महिला उद्योजक नवीन कल्पना, उत्पादने आणि सेवा सादर करून तंत्रज्ञान विकासास हातभार लावतात. त्यांच्या नवकल्पक दृष्टिकोनामुळे बाजारपेठेत स्पर्धात्मकता निर्माण होते.उदा. किरण मजुमदार-शॉ यांनी भारतातील जैवतंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडवली.तसेच फाल्गुनी नायर यांनी महिलांच्या नेतृत्वाखालील यशस्वी ई-कॉमर्स कंपनी.स्थापन केली.कल्पना सरोजयांनी सामाजिक स्तर उंचावत उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. .या उदाहरणांमधून महिलांनी केवळ स्वतःसाठीच नव्हे तर देशाच्या अर्थव्यवस्थेसाठीही मोठे योगदान दिले आहे.

महिला उद्योजकता ही केवळ आर्थिक क्रियाकलाप नसून ती सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे. महिलांनी उद्योग क्षेत्रात केलेले योगदान देशाच्या GDP वाढीस, रोजगारनिर्मितीस आणि स्थिर आर्थिक विकासास सहाय्यक ठरले आहे.महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देणे म्हणजेच देशाच्या आर्थिक प्रगतीस दिशा देणे होय. त्यामुळे प्रत्येक समाजाने आणि शासनाने महिलांना उद्योजकतेसाठी प्रोत्साहन, आधार आणि संधी देणे अत्यावश्यक आहे.

**संदर्भ:-**


1. भारत सरकार -महिला व बालविकास मंत्रालयाचे अहवाल.
2. Reserve Bank of India - MSME Sector Repot
3. Economic Survey of India (2024-25)
4. प्रा . शैलजा सांगळे ,महाराष्ट्रातील महिला उद्योजकता ,डायमंड पब्लिकेशन
5. राजेश परमार ,परिपूर्ण व्यक्ती ते संपन्न उद्योजक , अस्मिता प्रकाशन
6. मनोज अंबिके ,यशस्वी उद्योजक ,माय मिरर पब्लिशिंग हाउस
7. वि.दा. पिंगळे ,प्रेरणा स्रोत मराठी उद्योजक, शब्दाई प्रकाशन
8. Wikipedia –https : //mr.wikipedia.org vikaspedia
9. https://socialwelfare.vikaspedia